Source: Loksatta
Date: 25 April 2022

# संकटांना तोंड देऊन विद्यार्थ्यांनी मार्गक्रमण करावे

## एस.एन. सुब्रमण्यम यांचे प्रतिपादन; आयआयएम नागपूरचा दीक्षांत समारंभ; ४२४ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** युद्ध, तणाव, महागाई, आर्थिक युद्ध यांनी ग्रासलेल्या जगात आपला प्रवेश होतो आहे. या सर्वांना तोंड देऊन तरुणांनी मार्ग काढावा लागणार आहे, असे प्रतिपादन लार्सन अँड टुब्रोचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक एस.एन. सुब्रमण्यम यांनी केले.

भारतीय व्यवस्थापन संस्था (आयआयएम) नागपूरच्या चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या दीक्षांत समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर नागपूर आयआयएमचे अध्यक्ष सी.पी. गुरनानी, संचालक डॉ. भीमराया मेत्री आणि संचालक मंडळाचे इतर सदस्य उपस्थित होते. आयआयएमच्या मिहान येथील नव्या परिसरात हा कार्यक्रम झाला. यावेळी दीक्षांत समारंभात एकूण ४२४ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते या पदवी प्रदान करण्यात आल्या. अंकिता जोशी आणि ऐना गुप्ता यांना विशेष शैक्षणिक कामगिरीसाठी तर टी. भारत आणि शेख फरीद अहमद यांना सर्वांगीण कामगिरीकरिता पुरस्कार देण्यात आले. डिंपी खुराणा आणि समृद्धी कोळी यांना संस्थास्तरावरील पुरस्कार प्रदान करण्यात आले.




सुब्रमण्यम पुढे म्हणाले, आयुष्यात कष्टांना पर्याय नाही आणि कोणतेही शॉर्टकट चालत नाहीत. अनेक क्षेत्रात प्रचंड ज्ञान उपलब्ध आहे आणि सतत शिकत राहण्याचा उत्साह कायम टिकवला पाहिजे. नेहमीच्या कामाशिवाय संगीत, खेळ अशा विविध विषयांची कौशल्ये अवगत करावी. त्यामुळे, आपली हार किंवा जीत झाली तरी आयुष्यात तोल राखणे सोपे जाते. मध्यममार्ग स्वीकारायला शिकले पाहिजे. व्यापक विचार करणे, तंत्रज्ञानावर हुकूमत मिळवणे, पर्यावरणपूरक विचार करणे आणि इतरांपेक्षा कांकणभर पुढे राहणे यावर तरुणांनी लक्ष केंद्रित करायला हवे, असा सल्लाही सुब्रमण्यम यांनी दिला.

जग संकटात सापडले असताना भारतात मात्र अनेक तरुण कितीतरी नव्या गोष्टी करू बघत आहे. या तरुणांमुळेच देशात प्रचंड प्रमाणात सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली आहे. हीच ऊर्जा वयस्कांनाही चांगले काम करण्यास भाग पाडते आहे. उद्योजकता असो की आयपीएल, या प्रत्येक गोष्टीतून आपल्याला हेच बघायला मिळते आहे, असेही ते म्हणाले.

जागतिक दर्जाच्या नेत्यांमध्ये कामाप्रती पॅशन आणि समर्पण पुरेपूर भरले असते. तरुणांनी त्यांच्यातील ही ऊर्जा आत्मसात करावी. आपण परंपरा निर्माण करणे आणि सतत बदल घडवून आणणे यासाठी जन्माला आलो असल्याचे लक्षात ठेवावे, असे सी.पी. गुरनानी आपल्या भाषणात म्हणाले. डॉ. मेत्री यांनी आयआयएम, नागपूरच्या प्रगतीबद्दल माहिती दिली.